# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २९.३.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार **दिनांक २९ मार्च २००७** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.४०वाजता **''वंदेमातरम्**''या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१४. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२०. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२३. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२४. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ

२७. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२८. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३२. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
३३. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३४. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३५. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.राऊत छाया विलास
४१. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४२. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४३. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४४. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४५. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४६. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४७. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४८. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४९. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५०. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५१. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५२. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५३. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५४. स.स.श्री.खुडे विजय किसन
५५. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५६. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५७. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५८. स.स.श्री.भगवान देविदासराव घडमोडे
५९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६०. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६१. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६२. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
६३. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर

६४. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६५. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६६. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६७. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
६८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६९. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७१. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
७२. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७३. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७४. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
७५. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.संतोष खेंडके : या सभागृहाचे स.नगरसेवक श्री.साहेबराव कावडे यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : ह्दय विकाराने निधन झाले या सभागृहाचे आपले सहकारी होते. कामाचा अनुभव मोठा होता,गाढा अभ्यास होता.त्यांचेमूळे अनेक कामात उणीवा भासणार आहे. जी सूचना मांडली त्यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी उभे रहावे .

याचवेळी स.सदस्य स्व.साहेबराव कावडे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.सतीश कटकटे : १९८९ ते ९० पासून सिल्लेखाना लक्ष्मण चावडी रोडचे रूंदीकरणाच्या वेळी सर्वसाधारण सभेने संतोषी माता मंदीर स्थलांतर करण्याचा ठराव घेतला होता. त्यांना पर्यायी जागा देणार होते. अदयाप पर्यत जागा दिलेली नाही. जागा द्यावी नंतर सभागृह चालू करावे.

श्री.संजय केनेकर : अभिनय टॉकीज पासूनच्या रस्त्याचे रूंदीकरण चालू असतांना संतोषी माता मंदीर चे स्थलातंर करण्यात आले व महानगरपालिका जागा देणार म्हणून निश्चित केले होते. या बाबतीत अनेक वेळ स.सदस्यांनी मा. आयुक्त यांना लेखी पत्र दिलेले आहे कार्यवाही झालेली नाही.

मा.महापौर : स.सदस्य श्री.सतीश कटकटे तसेच सभागृहनेता यांचे १५ दिवसापूर्वी पत्र प्राप्त झालेले आहे,त्यावर मा.आयुक्तांची सही सूध्दा आहे. त्यांचे वार्डातील लक्ष्मी माता

मंदीर स्थलांतरासाठी पर्यायी जागा दिलेली आहे तत्कालिन आयूक्तांची सही आहे. प्रत्यक्ष ताब्यात दिलेली नाही. सभा संपल्यानंतर आम्ही सर्व पदाधिकारी व मा.आयुक्त सदर जागा पाहणी करून ती त्वरीत देण्याची कार्यवाही होईल.

**विषय क्र. ७८० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका आस्थापनेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (०२) अन्वये उपआयुक्त पदावर एखाद्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. दिनांक १३.०४.०६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.२४१/०२ अन्वये श्री.अे.बी.आनंदकर उपआयुक्त (म) यांना त्यांच्या महानगरपालिकेतील प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक ०७/०४/२००६ रोजी संपलेला आहे. सर्वसाधारण सभेने वरील ठरावानुसार त्यांच्या मुदतवाढीस मंजुरी नाकारलेली आहे. तरी ते अद्यापही कार्यरत आहेत.

तरी सर्वसाधारण सभेच्या निर्णयाचा मान राखून श्री.अे.बी.आनंदकर यांना त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे तसेच श्री.कमलाकर फड, कर निर्धारक व संकलक यांच्याही प्रतिनियुक्तीचा कालावधी संपलेला असल्याने त्यांनाही महानगरपालिका सेवेतून त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे. या करीता हा नविन प्रस्ताव पुन्हा मंजुरीस्तव सादर.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.किशनचंद तनवाणी,श्री.रेणुकादास वैद्य,श्री.संतोष खेंडके पाटील,श्री.अ.साजेद अ.सत्तार
अनुमोदक : श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय,श्री.सतिष कटकटे, श्री.महेश माळवतकर, श्री.गजानन बारवाल

**चर्चा :**

श्री.किशनचंद तणवानी : तत्कालिन आयुक्त यांनी पत्र दिलेले आहे. त्याची अमलबजावणी व्हावी.१५ दिवसापूर्वी जे नियमानूसार सात दिवस अगोदर मी एक प्रश्न विचारलेला होता. कार्यक्रम पत्रिकेवर तो प्रश्न आहे. त्यांचे उत्तर अदयाप का मिळालेले नाही. कारण काय, खुलासा करावा.

मा.महापौर : मा. आयुक्त १५ मिनिटात येतील ते स्वत: उत्तर देतील.

श्री.किशनचंद तणवानी : नियमानुसार प्रश्नांचे उत्तर मिळत नाही. तोपर्यत सभा तहकूब करावी अशी विनंती आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : नियमानूसार माजी महापौर यांनी प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर जोपर्यत मिळत नाही तोपर्यत सभा तहकूब करावी.

श्री.मुजीब खान :इतर अनेक प्रश्नाचा खूलासा घ्यायचा आहे. मा.आयुक्त सभागृहात नाही उत्तर कोण देणार आहे त्यासाठी सभा तहकूब करावी.

श्री.संतोष खेंडके : माजी महापौर श्री.तणवानी यांचे प्रश्नाचे उत्तर मिळत नाही तोपर्यत सभा तहकूब करावी.

मा. महापौर :१० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते.(दु.१२.४५ वा.सभा तहकूब पून्हा १.१० वा. सभेला सुरूवात होते.)

श्री.किशनचंद तणवानी : मी जो प्रश्न विचारलेला होता त्यांचे उत्तर तर मिळालेच नाही परत आपल्या निदर्शनास आणून देतो की विषय क्र २४१ दिं १३.४.२००६ रोजी सर्वसाधारण सभेमध्ये प्रशासनाकडून प्रस्ताव आलेला होता की उपआयुक्त श्री. आनंदकर अरूण यांना एक वर्षासाठी मूदतवाढ देण्यात यावी. ती मूदतवाढ या सभागृहाने

नाकारलेली होती. त्यास एक वर्ष होत आहे पून्हा एप्रिल महिना येत आहे. आजपर्यंत श्री. आनंदकर हे त्याच पदावर या महानगरपालिकेत आहेत. मी प्रश्न विचारलेला होता की कोणत्या नियमानूसार काम करीत आहे. त्या प्रश्नाचे उत्तर मला मिळालेली नाही.

श्री.मुजीब खान : खंत वाटते की, माजी महापौर श्री. तणवानी यांनी सात दिवसापूर्वीच प्रश्न विचारलेला होता अदयाप त्यांना उत्तर दिलेले नाही. सभागृहाच्या वतीने विनंती करतो की आजच्या आज संबधीत अधिकारी यांना कार्यमूक्त करावे. त्यांना येथे ठेवण्या बाबत महानगरपालिकेने मंजूरी दिलेली नाही. अशा प्रकारचे अनेक प्रश्नाचा खूलासा विचारलेला आहे त्यांचे पूर्ण उत्तर न देता अर्धवट उत्तर दिले जाते.

श्री.किशनचंद तणवानी :तसेच दुसरे उपआयुक्त श्री. फड साहेब यांची बहुतेक बदली झालेली आहे. त्यांचाही कार्यकाळ संपलेला आहे परत अशी अडचण येवू नये म्हणून त्यांना ही कार्यमूक्त करावे.

मा.महापौर : श्री.अरूण आनंदकर उपआयुक्त (म.) व श्री.कमलाकर फड कर मुल्य निर्धारक व संकलक यांची मुदत पूर्ण झालेली असून विधान सभेचे अधिवेशन संपल्यानंतर त्यांना कार्यमुक्त करण्यांत येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: जो निर्णय आपण दिला त्याची अमलबजावणी होणार की नाही.झाली नाही तर आपण काय कार्यवाही करणार आहोत याचाही खूलासा करावा कारण असे अनेक निर्णय मा.महापौर यांनी घेतलेले आहे. त्याची अंमलबजावणी झालेली नाही. स.सदस्य पत्र देतात कचराटोकरीत टाकले जाते.

मा. महापौर : उपआयुक्त श्री. कमलाकर फड तसेच श्री. अरूण आनंदकर यांचा नियमानूसार कार्यकाळ संपलेला आहे विधान सभेचे अधिवेशन चालू असेपर्यंत ते या महानगरपालिकेत काम करतील त्यानंतर त्यांना कार्यमूक्त करण्यात येईल.दिलेल्या निर्णयाची अमलबजावणी होईल.

श्री.मुजीब खान : विधान सभेचे अधिवेशन होईपर्यंत जे महानगरपालिकेचे अधिकार त्यांना दिलेले आहे ते परत घेण्यात यावे.

श्री.किशनचंद तणवानी :दोन्ही उपआयुक्त यांना कार्यमूक्त करण्या संदर्भात ऐनवेळी एक ठराव घ्यावा त्यात मी सुचक व स. सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय हे अनुमोदक राहतील.

मा. महापौर : ठरावाची गरज नाही. चर्चे मध्ये घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी होईल.या विषयाला एवढे महत्व देवू नये कार्यमूक्त करण्याचे ठरविले आहे.ठराव करून निर्णय पाहिजे असेल तर तसा ठराव दयावा निर्णय घेवू.

श्री.संतोष खेंडके : ऐनवेळचा ठराव म्हणून देण्यात येत आहे त्यास मंजूरी दयावी.

श्री.रेणुकादास वैद्य : सध्या या दोन्ही उपआयुक्तांचे काय काम आहे.

मा. महापौर : विधान सभेचे अधिवेशनात महापालिकेच्या संदर्भात अनेक प्रश्न आहे त्याची माहिती यांना दयावी लागणार आहे. त्यानंतर त्यांना कार्यमूक्त केले जाईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ (०२) प्रमाणे उपआयुक्त पदावर नियुक्तीचे अधिकार सर्वसाधारण सभेला असून सर्वसाधारण सभेने

श्री.अे.बी.आनंदकर उपआयुक्त (म.) यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्याने यापूर्वीही त्यांची मुदतवाढ नामंजूर केलेली असून व आताही श्री.अे.बी.आनंदकर उपआयुक्त (म.) यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी संपलेला असल्याने त्यांची मुदतवाढ पुन्हःश्च नाकारून त्यांना व श्री.कमलाकर फड, कर मुल्या निर्धारक व संकलक यांचाही प्रतिनियुक्ती कालावधी संपलेला असल्याने दोघांनाही औरंगाबाद महानगरपालिका सेवेतून विधानसभा अधिवेशन संपल्यानंतर कार्यमूक्त करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: सन २००४ मधील गादीया विहार येथील स्थायी समितीने मान्यता दिलेले काम अदयाप झालेले नाही. त्या संबधीची एक प्रत आपल्याकडे देत आहे. खुलासा घेण्यात यावा. उदया बजेटची सभा आयोजित केली. स. सदस्यांना बजेट बूक मिळालेले नाहीत.

मा.महापौर : सर्वसाधारण सभेकडे अर्थसंकल्प उदया सादर करणार आहे. त्यावेळी सर्व सदस्यांना बूक दिले जाईल ११ किंवा १२ तारखेला बैठक आयोजित होईल. गादीया विहार संबधी कार्यकारी अभियंता यांनी खूलासा करावा.

अति.शहर अभियंता :गादीया विहार ही सेल्फ डेव्हलपमेंन्ट म्हणून बिल्डरने परवानगी घेतलेली होती. तेथे रस्ते करण्याची जबाबदारी संबधीत बिल्डरची होती ते त्यांनी केलेले नाही. महानगरपालिका काम करेल परंतू तेथील डेव्हलपमेंन्ट चार्जेस त्यांनी भरावे असे पत्र संबधीतास देण्यात आलेले आहे. पैसे अदयाप भरणा केलेले नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :स. सदस्या सौ. खंदारे यांचे वार्डात डांबरीकरणाचे काम होणार आहे ते होत नाही म्हणून उपोषणास बसलेल्या आहेत. गादीया विहार हा परीसर त्याचे वार्डात येतो. सदर रेखांकन हे १९९१ पूर्वी मंजूर झालेले आहे. तत्पूर्वी त्या भागात खडीकरण वगैरे करण्यात यावे असे होते. डांबरीकरण केले पाहिजे वगैरे या नियमाचा अभाव होता. त्यावेळेस संबधीत बिल्डरला भोगवटा प्रमाणपत्र दिलेले असून यापूर्वी त्या वार्डाचे स. सदस्य श्री. निमगावकर यानी सूध्दा स्थायी समितीमध्ये मुद्दा मांडला होता की, त्यावेळी मा. आयुक्त यांनी कार्यवाही करण्याचे आदेशीत केलेले होते. तरी सूध्दा ते काम आजपर्यत झालेले नाही. मा.राज्यमंत्री श्री.शेवंगावकर यांनी सूध्दा या कामाच्या संदर्भात खूलासा मागविला होता व काम होईल असे म्हटले होते.पण झाले नाही. अर्थासंकल्पातील पान न. डब्ल्यू १५२ अ.क्र ४९ मध्ये पाच लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. कोणताही नियम काम करण्यास अडसर येत नाही गोर गरीबांवर अन्याय परंतू कामच करायचे नसेल तर ते अत्यंत चूकीचे होईल. ज्या गृह निर्माण सोसायटीमधील रस्ते महापालिकेकडे हस्तांतर केले नाही. तेथे काम करण्याची वेळ आली आहे. असे असतांना संबधीत बिल्डरांना भोगवटा प्रमाणपत्र कसे दिले.त्यावेळी ही अट नव्हती. काम करण्याचे आदेश दयावेत.

श्री.अ.रशिद खान : बिल्डरशी करारनामा केला असेल. त्या प्रमाणे काम केले नसेल तर त्यांचेवर गून्हा दाखल करा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सदर लेआऊटला १९८७-८८ च्या दरम्यान सेल्फ डेव्हलपमेंटसह मंजूरी दिली होती. यास २० वर्ष झाले आजपर्यत महापालिकेने बिल्डरवर काय कार्यवाही

केलेली आहे. तेथील नागरीकांना त्रास होत आहे बिल्डरची चूक आहे त्यांचेवर पोलीसास गुन्हा दाखल करावा.

मा.आयुक्त : ज्या काही सेल्फ डेव्हलपमेंन्ट संस्था आहे त्यांचे बाबतीत मागिल सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला की ज्या ज्या गृह निर्माण संस्थाना भोगवटा प्रमाण पत्र देण्यात आले आहे त्या बिल्डरांनी ज्या काही अटी शर्ती होत्या त्याप्रमाणे डेव्हलपमेंन्ट केलेले असावे. या बाबतीत ऑलरेडी सर्वसाधारण सभेने निर्णय दिलेला आहे. जर गादीया विहार येथील लोकांनी भोवगटा प्रमाणपत्र घेतले असतील सेल्फ डेव्हलपमेंन्टच्या स्कीममध्ये त्यांना डेव्हलपमेंन्ट चार्जेसची अट न लावता तेथे काम करून घेवू या.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: स.सदस्या सौ. खंदारे यांनी उपोषण सुरू केलेले आहे उपोषण सोडण्यासाठी कूणी जाणार की नाही.

मा. महापौर : सभा संपल्यानंतर उपोषण सोडविण्यात येईल.

श्री.सिताराम सुरे :माझ्या वार्डातील मयूरपार्क सह इतर १० गृह निर्माण संस्थाना पाणी देण्याचा प्रश्न अनेक वेळा उपस्थित केला.या संस्थाचा सर्वे करण्यात येईल असे मागिल बैठकीत आपण रूलींग दिले सर्वे झालेला आहे का केंव्हा पाणी देणार आहे.आजच्याआज पाणी चालू करावे. नागरीकांनी १००% बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केलेले आहे. गुंठेवारीत देतात तर अधिकृत वसाहतींना का नाही.

श्री.संजय सिरसाट : देखमूख नगर भागातही १० तारखेला पाणी सोडणार होते तोही खूलासा दयावा.

मा. महापौर : कार्यकारी अभियंता पाणीपूरवठा यांनी खूलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू) : मयूरपार्क व आसपासच्या परीसरासाठी किमान दोन एमएलडी पाणी आवश्यक आहे. येथे हर्सूलच्या टाकीहून पाणी दयावे लागेल. हरिसिध्दीतून एन ७ वर व एन -५ च्या टाकीतून पाणी दिले जाते. एन -५ ते एन -७ पर्यत ४०० एमएम डायमीटरची आरसीसी पाईपलाईन २५ वर्षापूर्वीची जूनी आहे सध्या २४ तास चालू राहते.त्यातून यापेक्षा जास्त चालवता येणार नाही. दोन एमएलडी पाणी वाढविता येणार नाही. त्यासाठी एन -५,ते एन -७ च्या टाकीवर १५० एचपीचे पंप लावावा लागेल.

श्री.रेणुकादास वैद्य : त्या भागात पाणी देण्यासाठी आतापर्यत का उपाययोजना केली नाही.

कार्य.अभियंता(पापू) :शहरामध्ये पंपींगव्दारे येणारे पाण्याशिवाय २ एम.एल.डी पाणी वाढवावे लागेल. तसेच एन -५ हून एन -७ वर पंप बसवावे लागेल व पाईपलाईन बदलावी लागेल. यासाठी ८० लक्ष खर्च अपेक्षीत असून बजेटमध्ये त्यासाठी तरतूद नाही.

श्री.सिताराम सुरे : १ वर्षापासून पाणी देण्या बाबत यंत्रणा का राबविली नाही. माझ्या वार्डातील नागरीकांना पाणी मिळावे अशी विनंती आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: सोसायटीने ३.६० कोटी बेटरमेंट चार्जेस भरले आहे. पाण्यासंदर्भात सहा महिण्यापासून चर्चा होत आहे.त्यानंतर एक कमेटी गठीत करावी म्हणून आपण आश्वासन दिले होते. दोन तीन मूद्यावर आपण आपल्या कॅबीनमध्ये बसून निर्णय घेवू असे म्हटले होते. परंतू तसे होत नाही. यामूळे प्रश्न सूटणार नाही. चार ते पाच लोकांची कमेटी नियुक्त करावी त्यात मा. आयुक्त राहतील व ज्या विभागाचे

संबधीत ते काम आहे ते विभाग प्रमुख राहतिल तसेच मा. सभापती स्थायी समिती यांचे समवेत बसून निर्णय घ्यावा. कोठून कूठे जास्तीचे पाणी जाते अधिकाऱ्याना माहित नसते. पाणी बचत करू शकतो तरच या भागात पाणी मिळेल. १ महिना यात जाईल. एक नगरसेवक ८ दिवसापूर्वी टेंशन घेवून घरी गेले.

श्री.सिताराम सुरे : मयूरपार्क पाणी देण्याची कार्यवाही करावी नसता पूढील बैठकीत मी विष घेवून आत्महत्या करील यांची नोंद घ्यावी. धमकी देत नाही.

श्री. काशिनाथ कोकाटे :स.स.श्री.सुरे यांची मागणी आहे. आजस्थितीत जाधववाडीत पाण्याची सुविधा व्हावी.सन २००० मध्ये आपण महापौर असतांना हरसिध्द कॉलनी भागात एका टाकीचे उद्घाटन केलेले होते. आता पून्हा आपण महापौर आहात.आताच संबधीत अधिकारी यांनी म्हटले की एन -५ ते एन -७ टाकीपर्यत ४०० एमएम व्यासाची पाईपलाईन ने पाणीपुरवठा करता येईल. या ठिकाणी पाणी कसे आणायचे ते आपण पहावे ठरविलेले करावे. जलकुंभ बांधले सन २००१ मध्ये मयूरपार्क भागात अंतर्गत जलवाहिन्या टाकलेल्या आहेत.त्यावर खर्च केलेले आहे. तेथील ३.०७ कोटी बेटरमेंन्ट चार्ज जमा झालेला असून ज्या भागात जलकुंभ झाले त्या आजूबाजूच्या भागात सर्व काम होवून सूध्दा अधिकारी यांनी दिलेले उत्तर संयुक्तीक वाटत नाही. जलकुभं भरले जाते तर ते पाणी जाते कूठे असा प्रश्न आहे. ज्या भागासाठी ती टाकी बांधलली आहे त्या भागात पाणी दिले जात नाही. पाणी देण्याचे आदेशीत करावे. पाणी कसे दयायचे हा प्रशासनाचा भाग आहे ते कार्यवाही करतील. कुठे कपात करायची आपण पहावे.

श्री.संजय सिरसाट : मागिल बैठकीत श्री. सुरे व श्री. निमगावकर यांचे वार्डात १० तारखेपर्यत पाणी देण्या बाबत सांगितले केले होते. त्यास मा.आयुक्तांनी ही दुजोरा दिला की दोन एमएलडी पाणी देवू शकतो. मा.महापौरांना विनंती की, कार्यकारी अभियंता श्री. डी.पी. कुलकर्णी यांचा खुलासा घेण्यात यावा की, देशमूखनगर भागात पाणी का आलेले नाही .

श्री.मुजीब खान : एक प्रश्न नाही अनेक प्रश्न असून वारंवार स.सदस्य सूचना मांडतात पत्रही देतात परंतु कार्यवाही केली जात नाही. एक वर्षापासून पाण्यासाठी स. सदस्य मुद्या मांडत आहे बजेटमध्ये तरतूद करण्याची जबाबदारी प्रशासनाची नाही का? स. सदस्यांच्या कोणत्याही प्रशनाकडे प्रशासन डोळेझाक करते.आता प्रशासन खूलासा करीत आहे की ८० लक्ष रू. लागतील बजेटबूक मध्ये तरतूद का ठेवली नाही. स. नगरसेवक व प्रशासन या महापालिकेची दोन चाके आहे. जर एकतर्फी काम होत असेल तर योग्य नसून २३ महिने सदस्यांना निवडून येवून झाले. वार्डात कोणतेही काम झालेले नाही.

श्री.संजय सिरसाट : गेल्या बैठकीत मा.महापौरांनी, मा. आयूक्तांनी घोषणा केली होती. १० तारखेला पाणी का दिले नाही.

श्री.भगवान घडमोडे : लिगल वसाहत असून लोकांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केले.वेळोवेळी निवेदन दिलेले असून तेथे पाणी दिले जात नाही खेदाची बाब आहे. पाणी कसे दयायचे त्यांचे नियोजन प्रशासनाने करावे. यापूर्वी यावर चर्चा झालेली होती.काही भागात

दररोज पाणी तर काही भागात एक दिवसाआड पाणी दिले जाते. २५ टक्के शहरात पाणी नाही. पाणी वाटपाचे नियोजन करावे. एक वार्डाचा प्रश्न नाही. माझ्या माहिती प्रमाणे अधिकाऱ्याना पाईपलाईन कूठे आहे माहित नाही. जेथे सांगेल तेथे पाण्याची पाईपलाईन टाकून पाणी दिले जाते असे नियोजन करून सर्वांना पाणी मिळणार नाही. त्यासठी एक एजन्सी नियुक्त करावी पाणी वाटपाचे नियोजन करावे. मयुरपार्क भागात पाणी दयावे व ते पाणी देतांना शहरातील पाण्याचे संतूलन कसे राहिल याचा विचार करावा.

सौ.रजनी जोशी : पाणी म्हणजे जीवन , प्रत्येक भागात पाणी देण्यात यावे. सदर मयूरपार्क भाग वार्ड ब कार्यालया अतंर्गत येतो. या संदर्भात प्रभाग समिती सभापती या नात्याने मा.आयुक्त यांना वेळोवेळी पत्र दिलेले आहे. १५ दिवसाच्याआत पाणी दिले नाही तर सर्व महिलांना घेवून अंदोलन केले जाईल.

सौ.पार्वती वाघमारे : वार्डात ३०० नळ कनेक्शन घेतले लाईन १५ वर्षापूर्वीची आहे १० मिनीटे पाणी येते. या कनेक्शन मूळे मोठमोठे खड्डे पडले टँकरही येवू शकत नाही.काही भागात पाणी येते तर काही भागात पाणी येत नाही, पाणी का येत नाही म्हणून कूणीही अधिकारी पाहणीसाठी आलेले नाही. त्यामूळे घेतलेले नळ कनेक्शन त्या नागरीकाचे उपयोगाचे नाही.

श्री.शशांक विसपूते : पूंडलिकनगर जवळच बाळकृष्ण,रेणुका नगर भागात लोक गुंठेवारीत येत आहे.कॉलनीपर्यत पाईपलाईन टाकण्याचे काम महापालिकेने केले आहे. गुंठेवारीतून किती रक्कम जमा झाली यावर ते काम करणे अवलंबून राहील असे उत्तर दिले जाते.कॉलनीत पाणी जेथून वाटप होईल तो लाईनचा खर्च गुंठेवारीच्या माध्यमातून करण्यास हरकत नाही. त्यांना पाणी देणार की नाही.

मा.आयुक्त :गुंठेवारीतून किमान होत असलेल्या कामाच्या ८० टक्के रक्कम जमा होणे अपेक्षीत आहे तरच तेथे ते काम होईल.

श्री.शशांक विसपूते : गजानन नगर भागात ३०० लोकांनी नळ कनेक्शन घेतले याचा अर्थ गुंठेवारीचे पैसे भरण्यास लोक पूढे येत आहे. कॉलनीपर्यत पाईपलाईन टाकण्यात यावी व त्यानंतर तेथून पाणी वाटप करते वेळी जे काही नियमाने ८० टक्के रक्कम भरणा होईल तेंव्हा दयावे.

श्री.संतोष खेंडके : पूंडलिकनगर भागात आठ ते दहा वार्ड येतात. लोकवर्गनीच्या माध्यमातून या भागात ८३ लक्ष रू जमा झालेले आहे.ही रक्कम वार्डवाईज विभागून जेथे पाण्याचे वाटप होईल त्या भागातून ७० लक्षची पाईपलाईन टाकावी म्हणून टेंडर सूध्दा काढलेले होते.पूंडलिकनगरच्या बाजूलाच न्यायनगर हुसैन कॉलनी हा माझा वार्ड असून तेथे क्रॉस लाईन टाकण्याचे बाकी आहे क्रॉस लाईन टाकाव्या, काम होत आहे असे लोकांच्या भावना निर्माण होवून तेथील लोक पैसे भरण्यास पूढे येतील. रस्त्याच्या दुसऱ्या भागात पाणी दिले जाते. न्यायनगर, हुसेन नगर मध्ये पाणी दिले जात नाही. माझ्या वार्डात वितरण व्यवस्था नाही. मुख्य जलवाहिनी टाकलेल्या आहेत. न्यायनगर, हुसेन नगर येथे पाणी पुरवठा का होत नाही.

मा. महापौर : न्यायनगर हुसैनी कॉलनी तसेच बाळकृष्णनगर संदर्भात खूलासा करावा.

श्री.महेश माळवतकर : इतर कामासाठी बजेटमध्ये तरतूद केली जाते पाण्याच्या खर्चासाठी का केलेली नाही. मयूरपार्क लिगल १५ वर्षापासूनची वसाहत आहे. पाणी देण्या संदर्भात प्रशासनाने का दखल घेतलेली नाही तेथे अगोदर पाणी दयावे.तरतूद का केलेली नाही त्याचा खूलासा घेण्यात यावा.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :नंदनवन कॉलनी हा भाग लिगल असून ५० टक्के भागात पाणी पूरेसे दिले जात नाही.

श्री.सिताराम सुरे : माझ्या वार्डाचा प्रश्न आहे. मी पहिल्यांदा बोललो.

श्री.संतोष खेंडके : नुसते ऐकूण चालणार नाही कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : जोपर्यत पाईपलाईन टाकत नाही तोपर्यत पाणी देता येत नाही असा खूलासा प्रशासनाने केलेला आहे.ज्या भागात लोक कर भरणा करत असतील नसतील त्या भागात सूध्दा पाण्याची टंचाई आहे. येणारे उत्पन्न व होत असलेला खर्च ही अडचण समजून घ्यावी. प्रत्येकानी माझ्या वार्डात पाणी टंचाई आहे असे मत मांडणे संयुक्तीक आहे का ?असे

श्री.सिताराम सुरे : १५ वर्षात अधिकाऱ्यांना समजले नाही का. पाणी जो पर्यंत मिळणार नाही तोपर्यंत सभा चालवू नये.

कार्य.अभियंता (पापू) : न्यायनगर हुसैन कॉलनी भागात डिस्ट्रीब्युशन लाईन टाकलेल्या असून क्रॉस कनेक्शन दयायचे आहे. १९९२ पर्यत जेवढे पाणी शहरात येत होते तेवढेच पाणी मागिल वर्षापर्यत येत होते. जोपर्यत जायकवाडीहून पाणी वाढविले जात नाही तोपर्यत इतर ठिकाणी पाणी देण्यासाठी पाईप लाईन टाकण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करणयास अर्थ नव्हता. १.६२कोटी रू. खर्च करून जायकवाडी व फारोळा येथे काही पंप वाढविले. आणि १४०० एमएम डायमिटरच्या पाईलपाईनचे पूर्ण कॅपॅसिटी यूज करून जेवढे पाणी वाढविता येईल तेवढे पाणी वाढविलेले आहे. गेल्या वर्षी नोंव्हे-डिसें. पासून१० एमएलडी पाणी वाढविण्याची शक्यता आहे. त्यातील पाच एलएलडी पाणी गुंठेवारी भागात तर पाच एमलडी पाणी मंजूर रेखांकनातील भागात दयायचे आहे. असे प्रस्तावीत असून ज्या ठिकाणी लाईनचे कॅपॅसिटी व पंप बघून तेथील भागात जास्तीचे पाणी देवू शकत नाही. मयूरपार्क भागात पाणी दयायचे झाल्यास अंदाजीत खर्चाचा खूलासा केलेला आहे. २५ वर्षापूर्वीची लाईन आहे. पंप लावून पाणी वाढविण्याचा प्रयत्न केला तर ती फुटण्याची शक्यता आहे. त्यास डीआय पाईप टाकण्याशिवाय पर्याय नाही. पूर्णशहरासाठी प्लॅनीग करण्यासाठी एक महिण्यापूवी टाईम्स ऑफ इंडियामध्ये पूर्ण भारतभर जाहिरात दिलेली आहे. चार एप्रिल २००७ रोजी सर्व कन्सलटन्टला बोलवून पाण्याचे नियोजन करण्यासाठी काय करता येईल. शहराच्या लोकसंख्येत वाढ झालेली असून आहे त्याच डायमीटरला वाढ केलेले आहे. पाईपलाईनवर जेवढे कनेक्शन पाहिजे त्यापेक्षा जास्त दिलेले आहे. मागिल पाईपलाईन बदलाव्या लागतील तर पूढील लाईन बदलून उपयोग उपयोग होईल त्यामूळे तरतूद केलेली नाही. देशमुख नगर भागात महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या ६७.०३ कोटीच्या योजनेतून टाकी बांधण्यात आलेली आहे. शिवाजीनगरची टाकी क्रांतीचौकातून

पंपीगने भरली जाते. तसेच २० ते २२ तास पंपीग व्दारे पुरवठा करतो त्यामूळे काही ठिकाणी रात्री उशीरा पूरवठा केला जातो. त्याच प्रमाणे पुंडलिकनगर टाकी बांधलेली आहे. ६७ कोटीच्या योजनेतून जी काही ६५ एमएलडी पाणी वाढणार होते ते तांत्रिक कारणामूळे वाढ झालेली नाही. वाढ न झाल्यामूळे देशमूख नगर पाणी देण्यासाठी त्या टाकीमध्ये पाणी देता येत नाही. १५ लक्ष लिटरची टाकी आहे. गुंठेवारी भागात पाण्याच्या पाईपलाईन टाकलेल्या आहेत काही लोकांनी पैसे न भरणा केल्यामूळे पाणी सोडलेले नाही.

श्री.सिताराम सुरे : १००% टाकी भरल्यानंतर पाणी पुरवठा करता येईल. माझ्या वार्डातील पाणीप्रश्नाचा जो पर्यत खूलासा होत नाही तोपर्यत ही सभा तहकूब करावी.त्या भागात अंतर्गत पाईपलाईन टाकलेल्या आहे लोकांनी कोटेशन भरणा केले नळ कनेक्शन घेतलेले आहे.

मा. महापौर : इतर पाईल लाईन असेल परंतू पाणी पुरवठा होण्यासाठी जलवाहिनी टाकल्यानंतरच पाणी देता येईल असे प्रशासनाचे मत आहे. मा. आयुक्त यांनी खूलासा करावा.

मा. आयुक्त : शहराची परीस्थिती बघता माहिती दोन तीन महिण्यात १० एमएलडी पाणी वाढविलेले आहे. येणाऱ्या दोन तीन वर्षात पाणी वाढणार नाही. पाण्याचे वाटप योग्य पध्दतीने नियोजन करून, तसेच जे अनधिकृत नळ कनेक्शन कट करून व जे ही गळती होत आहे ती बंद करून पाण्यामध्ये वाढ होवू शकते. सर्वसाधारण सभेने दिलेल्या निर्णयानूसार शहरातील पाण्याचे वाटप योग्य रितीने करून त्यासाठी नियोजन करणे बाबत कार्यवाही करावी म्हणून येत्या ४ तारखेला पीएमसीची नेमणूक करून वितरण व्यवस्था कशी सुधारता येईल व तीन चार महिण्यामध्ये पाणी वाटपाच्या पध्दतीत सुधारणा करून लोकापर्यत जास्त पाणी पोहचता येईल. मयुरपार्क मध्ये पाणी दयावयाचे झाल्यास एन -५ ते एन -७ पर्यत पाईपलाईन बदलावी लागेल तसेच दोन एमएलडी पाण्याची वाढ पाठीमागून करावी लागेल.पाच एमएलडी पाण्याची वाढ करून लिगल सोसायटींना पाणी देवू असे ठरले परंतू या शहरात अनेक गृह निर्माण संस्था असून त्यांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केलेले आहे.त्यांचेसाठी पाणी देण्याचे ठरले तरी १५ ते २० एमएलडी पाण्याची मागणी आहे. पाच एमएलडी पाणी वाढणार ते कोणत्या भागात किती प्रमाणात दयायचे यांचे मयुर पार्कला पाणी द्यायचे असेल तर कोणत्या भागातील पाणी कमी करून द्यावयाचे हे ठरवून द्यावे.

श्री.सिताराम सुरे : हे काम प्रशासनाचे आहे. आमचे नाही. आम्हाला पाणी द्या १४०० मी.मी.व्यासाच्या जल वाहिनीपेक्षा सदर ३०० मी.मी.व्यासाची ही पाईपलाईन किती तरी पटीने चांगली आहे.आजपर्यत फुटलेली नाही. हडको भागात काही ठिकाणी दोन दोन तास पाणी रस्त्यावरून वाहते ते पाणी देवू शकत नाही का ?

मा. आयुक्त : सदर पाईप लाईन २४ तास चालू आहे. एन -७ च्या टाकीत सध्या जेवढे पाणी येते त्यापेक्षा जास्त पाणी येवू शकत नाही.

मा. महापौर : मयुरपार्क येथे पाईपलाईन टाकलेल्या असतील व नळ कनेक्शन दिलेले असेल तर आठ दिवसात पाणी सोडण्यात यावे.

श्री.वसंत नरवडे : जून्या शहरात नियोजन नसल्यामूळे पुरेसा पाणी पुरवठा होत नाही.क्रांतीचौक तिलकपथ पैठणगेट पासून ज्योतिबा फुले चौक ते खडकेश्वर पर्यत अनेक ठिकाणी पाण्याच्या संदर्भात अडचणी आल्या अनेक भागात लाईन टाकलेल्या आहेत.पाण्याचे जास्त दाबाने पाणी येत नाही, काही ठिकाणी चोकअप झालेल्या असून काही वेळा घाण पाणी येते. या सर्व दुरूस्तीच्या कामासाठी बजेटमध्ये तरतूद करावी. मोंढा ते खडकेश्वर पर्यतची लाईन जूनी असून सर्व मिळून चार चार लाईन टाकल्या गेलेल्या आहेत.वाटेल तेथे वॉल टाकतात वेळोवेळी खुले केले जाते. एकच लाईन टाकावी एकच पुरवठा लाईन असावी. नकाशा व्यतिरिक्त तेथे लाईन नसावी.

मा. आयुक्त : यासाठी पूर्ण शहराचा अभ्यास करून कुठे लाईन टाकायची आहे. कूठे वॉलटाकायचे आहे. हे शस्त्रोक्त पध्दतीने व्हायला पाहिजे. पूर्ण शहरासाठी एक कन्स्ल्टंन्ट नेमावे म्हणून सर्वसाधारण सभेने आदेशीत केलेले आहे. प्रोसेस पूर्ण केलेली आहे ४ एप्रिलला वाटाघाटी आहे एक दिड महिण्याच्या आत एजन्सी निश्चित होईल.

मा. महापौर : शहरातील पाणी वाटप नियोजन चांगले करण्यासाठी एक कन्स्ल्टंन्ट नेमावे म्हणून मागिल बैठकीत रूलींग दिलेली आहे.दोन तीन महिण्यात नियोजन कसे करता येईल ते सभागृहा समोर येईल. हुसैन कॉलनी न्याय नगर भागात पाणी का देवू शकत नाही. तसेच जो मुख्य जलवाहिनी आहे तिचे काम पूर्ण केले पाहिजे.

कार्य. अभियंता पापू. : हुसैन कॉलनी, न्यायनगर भागात पाणी देण्यासाठी क्रॉस कनेक्शन किती खर्च येईल ते बघून कार्यवाही होईल त्यानंतर १५ दिवसात या बाबतीत निर्णय घेता येईल.

मा. महापौर : न्यायनगर हुसैन कॉलनी भागात १५ दिवसात पाणी दिले जाईल. तसेच स. सदस्य श्री. विसपूते यांचे वार्डात संबधीत अधिकारी हे पाहणी करतील व मुख्य रस्त्यापर्यत महानगरपालिकेच्या वतीने पाईपलाईन टाकली जाईल. गुंठेवारी भागात गुंठेवारीचे पैसे जमा झाल्यानंतर पाईपलाईन टाकल्या जातील.

श्री.संजय रिडलॉन : बजांरा कॉलनी मध्ये नाल्यामध्ये अंडर ग्राऊड ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम सूरू आहे. मा. आयुक्तांनी पाहणी केलेली होती. रोकडी या कॉलनी बंजारा कॉलनी अभिनय टॉकीजकडून जो रस्ता येतो त्या मार्गे पाण्याचे प्रेशर असते त्यामूळे ढापेतून पाणी रस्त्यावर येते. त्यासाठी पाईपलाईन मोठी करून पावसाळयामध्ये जी समस्या निर्माण होते ती होणार नाही.पूढील पाईप लाईन वाढवावी.

मा. महापौर : अति. शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कार्यवाही करावी.

श्री.भाऊसाहेब ताठे : हडको नवजिवन कॉलनी भागात ४० ते ४५ मिनिटे पाणी येते ते कमी दाबाने असते. एक तास पाणी दयावे जास्त दाबाने दयावे.

मा. महापौर : मी प्रत्यक्ष त्या ठिकाणी पाहणी करेल.

श्री.रविंद्र गांगे : बालाजीनगर, न्यू बालाजी नगर भागात पाणी नवीन पाईप लाईन टाकाव्या १५ वर्षापूर्वीची वसाहत असून लोक मालमत्ता कर भरतात अनेक लोक गुंठेवारी आलेले आहे.

मा. महापौर : संबधीत अधिकारी यांनी सदर ठिकाणी पाहणी करून माझ्याकडे माहिती दयावी आजची सभा १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ दु. २.३५ वा. पून्हा सभा दु. ३.२५ वा सुरू )

श्री.गजानन रामकिसन बारवाल : जुने उच्च न्यायालयाच्या पाठीमागून एक नाला येतो तो पदमपूरा मार्गे कॅन्टॉलमेंन्ट बोर्ड लिमीट मध्ये जातो. बोर्ड लिमीटच्या बाजूला सदर नाला १० फुट खोल दीड लक्ष रू.खर्च करून साफ केलेला होता. असे असतांना एक शेतकरी श्री.उदयसिंग यांनी पूर्ण पाणी अडवले असून पदमूपरा भागातील अनेक लोकांच्या घरात मागे पाणी येवून लोकांना मोठा त्रास होत आहे. तो नाला क्लिअर करून घ्यावा तसेच त्यांनी शेतीत दुषीत पाणी सोडले त्यामूळे अनेक डास झालेले असून त्या बाजूला लक्ष्मी माता मंदीर आहे त्या परीसरात मोठी घाण साचलेली असून या बाबत त्वरीत कार्यवारी करावी.

मा. महापौर : नाल्यावरील भिंत त्वरीत काढून तेथे पाणी अडणार नाही व तेथील जनतेला त्रास होणार नाही यासाठी तात्काळ कार्यवाही करावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : एकनाथनगर भागात तुळशी अपार्टमेंट,द्वारकापूरी वसाहत असून त्या ठिकाणी रस्ते, ड्रेनेज लाईन,गटार तसेच पाण्याची व्यवस्था नाही.जनतेची गैरसोय दूर व्हावी म्हणून बजेटमध्ये तरतूद ठेवली नाही. कशी व्यवस्था होईल.

मा.महापौर : या जागेची संबधीत अधिकारी यांनी पाहणी करावी. बजेट ठेवण्यासाठी अजूनही संधी आहे. तशी माझ्याकडे माहिती दयावी तरतूद करता येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे :ज्या ज्या वेळी वार्डात विकास कामे करण्यासाठी बजेटची मागणी करतो गुंठेवारीत येते म्हणून काम केले जात नाही. इमारत बांधकाम परवानगी ज्या वेळेस दिली जाते त्यावेळी गुठेवारीचा भागास अगोदर सुविधा का दिल्या जात नाहीद्धारकापूरी भागात अनेक लोकांनी गुुंठेवारीचे रक्कम भरणा केलेली असून तेथे विकास करणार की नाही.

मा. महापौर :गुंठेवारीचा भाग असेल तर तरतूद करता येणार नाही. त्या भागात संबधीत अधिकारी यांना पाठवून किती रक्क्म त्या भागातून जमा झालेली आहे. जर ८० टक्के लोकांनी रक्क्म भरणा केली असेल तर विकास काम करण्याचे प्रयत्न करू.

श्री.अ.रशिद खान : आताच आपण म्हटले की लोकांनी पैसे भरणा केले तर काम केले जाईल. जुना भाग आहे. या भागात लाईट,पाणी,व रस्तेची विकास कामे झालेली आहे. जसे नारळीबाग ई.

मा. महापौर : ज्या ठिकाणी महानगरपालिकेने विकास कामे केलेली आहे,जूना भाग आहे, तेथे अधिकारी पाहणी करतील.

श्रीमती कला बोरामणीकर: माझ्या वार्डातील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले त्याबद्दल धन्यवाद देते. रस्त्याच्या कडेला फुटपाथ किंवा पेव्हींग ब्लॉक बसविण्यात यावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : अतिक्रमण काढण्यास गेल्यानंतर तेथील लोकाच्या दबावाखाली येवून अधिकारी अतिक्रमण काढत नाही. एकनाथनगरच्या डी.पी जवळ निकाळजे कॉर्नर म्हणून लिहिलेले आहे १० ×१५ ची टपरी सध्या आहे. ती हटविणार की नाही.

श्री.अ.रशिद खान : घाटी दवाखाना रस्त्यावर मोठे अतिक्रमण झालेले आहे.

मा. महापौर : प्रशासकीय अधिकारी यांनी त्वरीत या ठिकाणी जावून पाहणी करावी व नियमानूसार कार्यवाही करावी. महापौरांना अहवाल देतील.

**<u>विषय क्र.७८१/१ :</u>**

दिनांक११.०१.२००७,२०.०२.२००७,२८.०२.२००७,१४.०३.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : दि.२०.२.०७ रोजीच्या इतिवृत्तातील पान क्र १३ वर बी ॲण्ड सी ऑफिसच्या समोरील जागा तसेच बाजूला महानगरपालिकेच्या जागेवर झालेले अतिक्रमण दोन दिवसात काढण्याची कार्यवाही होणार होती अदयाप का केलेली नाही.सदर संचिका सूध्दा सापडत नाही. चार बैठकीपासून या संदर्भात बोलत आहे.

मा.महापौर : येत्या आठ दिवसात सर्व अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:उपआयुक्त महसूल यांची बदली होत असेल तर अतिक्रमण तात्काळ काढले जाणार नाही.चार पाच सभांचे इतिवृत्त एकत्रित देण्यात आले. त्यावर अभ्यास करणे शक्य होत नाही. मागिल बैठकीचे इतिवृत्त पूढील बैठकीच्या वेळी देण्यात यावे.

मा. महापौर :नगरसचिव दोन महिने सुट्टीवर होते म्हणून म्हणून सूचना करण्यात येते की मागिल बैठकीचे इतिवृत्त पूढील बैठकीच्या वेळी देण्याची व्यवस्था करावी.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : पान क्र ३१ वर विषय क्र ७११ या विषयाला अनुसरून मी सभागृहात अशी चर्चा केली होती की क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन ही ४५ मीटर रूंद रस्त्यासाठी जागा भूसंपादीत करावयाची होती. हा विषय स्थगित यासाठी ठेवला होता की बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशन हा सूध्दा रस्ता घेतला जाईल. तो विषय येथे आलेला नाही. म्हणून या विषयावरील स्थगिती उठविण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: आताच स.सदस्य श्री. बारवाल यांनी ज्या विषया संदर्भात बोलले स्थगित विषय आहे पून्हा प्रस्ताव आणावा लागेल. त्याला कसे दुरूस्त करावा त्यावेळी दुरूस्त करता येईल. स्थगिती दिल्यानंतर ३ महिन्यानंतर पून्हा तो ठराव यावा लागतो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : नविन प्रस्ताव आणावा.

मा. महापौर : सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : स.सदस्यांचा गैरसमज झालेला दिसतो. स.विरोधी पक्ष नेता यांनी हा विषय पूढील बैठकीत घेण्यात यावा म्हणून तात्पूरती स्थगिती दिलेली होती. त्यामूळे हा प्रस्ताव स्थगित ठेवता येणार नाही. ४० मी.रस्ता रूंदीकरण करणे गरजेचे आहे. स्थगिती उठविण्यात येवून हा विषय मंजूर करण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : प्रस्ताव स्थगित ठेवल्यानंतर त्यावरील स्थगिती उठवू शकतो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : तीन महिण्यानंतर नवीन प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर निर्णय घेता येईल.

मा. आयुक्त : आपणास आपला निर्णय बदलावयाचा असेल तर तीन महिण्याची वाट बघावी लागते. परंतू यात नूसती स्थगिती दिलेली होती.

श्री. गजानन रामकिसन बारवाल : विरोधी पक्ष नेता यांचे विनंतीस मान देवून हा विषय स्थगित केलेला होता. आता तो मंजूर करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : हा रस्ता रहदारीचा आहे करणे आवश्यक आहे. रोषणगेट ते किराडपूरा या रस्त्याच्या कामासाठी २० कोटी रूपये पाठविलेले आहे. याची माहिती कदाचित सदस्यांना नसेल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सर्व माहिती मला आहे. १९७५ चा डी.पी प्लॅन नूसार अगोदर कार्यवाही करावी. नतंर असे नवीन प्रस्ताव सादर करावे.

श्री.भगवान घडमोडे : क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन हा रस्ता अत्यंत रहदारीचा आहे.शहराच्या विकासाच्या दृष्टीने तो रूंद करणे गरजेचे आहे.

श्री.अ.रशिद खान : यापूर्वी लेबर कॉलनी ते शहांगज तसेच टाऊनहॉल ते चेलीपूरा रोषणगेट पर्यत रस्त्ता घ्यावयाचे म्हटले होते तसे यात आलेले नाही.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : इतर जे रस्त्या संदर्भात स.सदस्यांचे प्रश्न असतील त्यास माझा विरोध नाही विरोधी पक्ष नेता यांनी तसा ऐनवेळी प्रस्तावा आणावा.हा प्रशासकीय प्रस्ताव आलेला होता मंजूर करावा.

श्री.भगवान घडमोडे : प्रस्ताव स्थगित केल्यानंतर स्थगिती उठवू शकतो परंतू रद्य केल्यानंतर तो प्रस्ताव तीन महिण्यानंतर आणावा लागतो.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.संतोष खेंडके : रस्ता रूंदीकरणास विरोध होत असेल तर योग्य नाही.इतर प्रस्ताव पूढील बैठकीत घेण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे : विकासाच्या कामात खिळ घालण्याचा प्रयत्न होत आहे.

मा.महापौर : इतिवृत्त कायम करतांना स्थगितीला मंजूरी करता येत नाही परंतू प्रस्ताव ठेवता येतो प्रस्ताव ठेवून मंजूरी देवू शकतो.प्रस्ताव आता ठेवायचा की पूढील बैठकीत ठेवायचा हे ठरवावे.

श्री.वसंत नरवडे : सभागृहात कोरम नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : सर्व विषय मंजूर करण्यात यावे.

मा. महापौर : सदरील प्रस्ताव पूढील बैठकीत ठेवण्यात यावा.

श्री. भगवान घडमोडे : पान क्र २९ ठराव क्र ७१० च्या संदर्भात मी व स.सदस्य श्री.माळवतकर यांनी सुचना मांडली होती की,शहरात बी.ओ.टी.तत्वावर जसे ५ हजार एनर्जी सेव्हींग दिवे लावले आहे, त्याच धर्तीवर सिडको आणि उर्वरीत शहरातही आणखी ५ हजार दिवे सध्याच्या मे.विनवॉक सिस्टम,नाशिक या एजन्सीकडूनच त्यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार लावण्यात यावे. अशी दुरूस्ती करावी.

मा. आयुक्त : सिडको मध्ये बीओटीवर बसवावे लागेल. एमआयडीसी भागात पेमेंन्ट बेसीसवर करावे लागेल.

मा.महापौर : सिडको हडको भागात एनर्जी सेव्हीग चे पथदिवे बसविण्यात यावे.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : पान क्र ३७ वर ठराव क्र ७१९ मध्ये श्री. पोपट कुंडलवाल यांना लग्नासाठी शाळा देण्यात यावी म्हणून रूलींग दिले होते अदयाप त्यांना शाळा दिलेली नाही.

मा.महापौर : मा. आयुक्तांनी परवानगी दिलेली आहे तशी रूलीगही मी दिलेली आहे.

सौ.अजंली कोंडेकर : इतिवृत्तातील पानक्र ३७ वर ठरावक्र ७२१ मध्ये सीटीएस क्र.चूकलेले आहे त्यात नभुक्र.१५७३५/७/पी,१५७३५/१३५/पी,१५५६१/१व१५७३७/ पी अशी दुरूस्ती करावी.

मा. महापौर : सीटीएस नंबर चूकलेला आहे तो बदल करण्यात यावा.

श्री. काशिनाथ कोकाटे : या ठरावात स.सदस्या सौ.कोडेंकर यांनी काही दुरूस्त्या सुचविल्या आहे. जो मंजूर रेखांकन आहे तो केंव्हाचा आहे त्यात बदल करायचा तर काय करणार आहे याची माहिती दयावी.

श्री.वसंत नरवडे : रेखांकन बदलण्याचे अधिकार या सभागृहाला आहे काय याचा खूलासा व्हावा.नसता सभागृहावर कार्यवाही होवू शकते.

मा.महापौर : यात फक्त सिटी सर्वे नंबर बदललेले आहे इतर बदल नाही.

श्री.वसंत नरवडे : माझा यास विरोध नोदवावा.

सौ.लता दलाल : माझाही अक्षेप आहे.

मा. महापौर : स.सदस्य यांचा यास विरोध नोंदवावा. यात फक्त दुरूस्ती करायची आहे.

श्री.संतोष खेंडके : इतिवृत्तातील विषय क्र ७३८,७३९ च्या संदर्भात जागा भूसंपादीत करायची आहे. महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती तशी नाही. त्यासाठी टीडीआर देण्यात यावा..

श्री.अ.साजेद अ. सत्तार :टीडीआर नूसार कार्यवाही व्हावी. रक्कम देण्यात येवू नये.

मा.महापौर : ठराव क्र ७३८,७३९ टीडीआर देण्यात यावे. इत्यादी दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे दिनांक २०.०२.२००७ चे इतिवृत्तांतील विषय क्र.७१० मध्ये सिडको हडको भागात बी.ओ.टी.तत्वावर दिवे लावणे, विषय क्र.७११ हा प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यास, विषय क्र ७२१ मध्ये नगर भूमापन क्रमांकात बदल झाल्याने सदर ठरावात न.भू.क्र १५७३१/७/पी, १५७३५/१३५/पी, १५५६१/१ च १५७३७/पी असा बदल करण्यास व विषय क्र.७३८,७३९ च्या ठरावात हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) देण्यात यावे इत्यादी दुरूस्तीसह दिनांक ११.१.२००७, २०.२.२००७,२८.२.२००७ आणि १४.३.२००७ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. ७८२/२ :</u>**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराची (वाढीव क्षेत्र अधिक ना विकास विभागाची) विकास योजना शासन, नगर विकास विभाग यांचेकडील अधिसुचना क्रमांक टी.पी.एस. ३०८८/४५४/प्र.क्र.५९/८८/नवि-१२ दिनांक १५, ऑक्टोबर १९९१ नुसार मंजुर करण्यात आली असुन ती दिनांक १९ नोव्हेंबर १९९१ पासुन अंमलात आली आहे.

मौजे नक्षत्रवाडी गट क्रमांक ५ मध्ये उत्कर्ष सहकारी गृह निर्माण संस्थेच्या मालकीची ४.९९ हेक्टर जमीन असून, या जमीनीच्या भागावर संस्थेचा रेखांकन प्रस्ताव वर्ष १९८५ पासून विचाराधीन आहे. तथापी दरम्यानच्या काळात विकास योजनेला अंतिम स्वरूप देण्याचे काम चालू असल्याने सदर संस्थेचा रेखांकन प्रस्ताव मंजुरी करता आला नाही.

सदर संस्थेच्या एकुण क्षेत्रापैकी पाणी पुरवठा योजना आणि २५.५० मीटर रूंद रस्ता व पंप हाऊससाठी ३१०० चौ.मी. अधिक ५३०० चौ.मी. अशी एकुण ८४०० चौ.मी. क्षेत्र जागेचे महानगरपालिकेसाठी संपादन करण्यात आले असुन, संस्थेच्या जागेत ७९०० चौ.मी.क्षेत्र उक्त विकास योजनेनुसार ना विकास विभागात समाविष्ट आहे.

या नंतरच्या कालावधीत पाणी पुरवठा विभागाने औरंगाबाद व सिडको वाढीव शहरासाठीची प्रस्तावीत पाणी पुरवठा योजनेसाठी अतिरीक्त बुस्टर पंपसाठी १०० मीटर×५० मीटर=५००० चौरस मीटर जागा अपेक्षित असल्याचे व सदर जमीन गट क्र.५ मधील उक्त संस्थेची निवासी क्षेत्रातील जागा तांत्रीक दृष्ट्या योग्य असल्याने ती ५००० चौ.मी. जागा अतिरीक्त बुस्टर पंपसाठी संपादन करणे बाबत विनंती केलेली आहे.

उक्त प्रमाणे पाणी पुरवठा विभागाची मागणी महानगरपालिकेसाठी व्यापक जनहिताच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याने, सदरची जमीन बुस्टर पंप विस्तारासाठी संपादीत करणे गरजेचे आहे.

त्यास्तव प्रकरणी मा.आयुक्त यांनी स्थळ पाहणी केली असुन,पाहणी अंती असे निश्चित करण्यात आले की ''महानगरपालिकेने,आवश्यकतेनुसार स्थळा वरील अस्तित्वातील बुस्टर पंप लगत असलेल्या उक्त संस्थेच्या निवासी क्षेत्रातील जागेतुन ५००० चौ.मी. जागा घ्यावी व या संपादन करावयाचा जागेचा चालु बाजार भावाप्रमाणे उक्त संस्थेस मोबदला द्यावा. तसेच संस्थेची उक्त विकास योजनेनुसार ना विकास विभागात समाविष्ट क्षेत्रातील अदमासे ७९०७.०० चौ.मी.जागा ना विकास विभागातून वगळुन रहिवास वापरात समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम-३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करावी. या शिवाय प्रकरण मा.न्यायालयातही प्रलंबित असल्याने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे महानगरपालिका औरंगाबादने विषयी उक्त प्रमाणे शपथपत्र दाखल करावे''. त्या प्रमाणे मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यात आले आहे.

तरी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम - ३७ नुसार फेरबदलाबाबतची पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करून, सदरचा फेरबदलाचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करावयाचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : यापूर्वी ८४०० क्वे. मीटर जागा अगोदर घेतलेली आहे. आणखी ५००० चौ. मीटर जागा घेत आहोत. व त्या बदल्यात ७९०० चौ. मी. भूसंपानातून वगळून तशीच झोन बदलून देत आहे.भूसंपादनची बाजार भावाप्रमाणे रक्कम देत आहोत. जागा डिलीट करण्याची एवढी गरज काय. दुसरी जागा घेण्यात यावी.

श्री.मुजीब खान : यात दोन प्रस्ताव असून दोन वेगवेगळे प्रस्ताव असावयास पाहिजे होते. एक भूसंपादनाचा व दुसरे डिलीट करण्याचा आहे. दोन प्रस्ताव वेगवेगळे यायला पाहिजे.

श्री.गजानन रामकिसन बारवाल : स्थगीत करण्यात यावे.

मा. महापौर　　: सदरील प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येतो. ०२ वेगवेगळे प्रस्ताव यायला पाहीजे होते. एक भूसंपादनाचा व दूसरा जमिन वापर बदलण्याचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ७८३/३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गुलमंडी ते पैठणगेट (टिळकपथ)औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना १५.०० मीटर रूंद रस्ता विकसीत करणे आहे. उक्त रस्ता बाजार भाग (Market Area) असुन फार वरदळीचा असुनअरूंद आहे. उक्त रस्त्यावर ६०% मिळकतधारकांनी बांधकाम परवानगी घेऊन तसेच अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक घेऊन इमारतीमागे हटवून बांधल्या आहेत. बाकी राहिलेल्या ४०% मिळकतधारकांनी मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद व मा.महापौर, महानगरपालिका, औरंगाबाद यांचेशी चर्चा झालेली आहे. व चर्चेअंति मिळकतधारकांनी अशी बाजु मांडली आहे की, आम्ही आज बांधकाम नाही केले तरी अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I) घेऊन ठेऊ म्हणजे उक्त रस्ता रूंदीकरणाकरीता रितसर भूसंपादनाची कार्यवाही सुरू झाल्यास अत्यंत कमी मोबदला रोख रक्कमेच्या स्वरूपात द्यावा लागेल. मंजुर विकास योजने प्रमाणे रस्ता १५.०० मीटर रूंद झाल्यास नागरीकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध होईल.

करीता बाधीत क्षेत्र संपादन करण्यासाठी रितसर भूसंपादनाचा प्रस्ताव सत्वर (Urgent Clause) आधारे करणे करीता मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे.

सबब उपरोक्त आरक्षणाखालील क्षेत्र भूसंपादन करण्यासाठी व त्यास लागणारा भूसंपादन खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री.गजानन रामकिसन बारवाल　: गुलमंडी ते पैठणगेट हा रस्ता नेहमी गजबजलेला असतो. १९९५ पासून मागणी करतो की हा रस्ता रूंदीकरण व्हायला पाहिजे. हा ठराव मंजूर करण्यात यावा.

श्री.मुजीब खान　: एकतर एफएसआय द्या किंवा मोबदला पैश्याच्या स्वरूपात मागितला तर पैसे द्या याप्रमाणे दुरूस्ती करावे.

मा. आयुक्त　: काही लोक रक्कम घेतील काही लोक एफएसआय घेतील.

श्री.मुजीब खान　: या प्रस्तावात दोन अलगअलग बाबी आहेत. एफएसआय देत आहोत कोणतेही एक दयावे.

मा. आयुक्त　: मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविला जाईल. ज्यांनी एफएसआय, टीडीआर किंवा पैसे मागविले तर त्याप्रमाणे कार्यवाही करू.

श्री.मुजीब खान　: ठरावात दूरूस्ती करावी. दोन्ही एकदाच सादर झालेले आहे.

श्री.अ.रशिद खान　: ५० फुट रूंद रस्ता पाहिजे, मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहे. ४० फुट ठेवला.चौक ते गुलमंडी ४० गुलमंडी ते पैठणगेट ५० व तेथून पूढे १०० फुटाचा रस्ता होत आहे. असे का. दुरूस्ती काय करीत आहे.

श्री.वसंत नरवडे　: पैठणगेट रंगारगल्ली ते सिटीचौक पर्यत १५ मिटर ठेवावा.ज्यांनी एफएसआय मागितला असेल,त्याना दयावा व राहिलेली जागा व इतर काम त्वरीत हाती घेवून

मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवून या बजेटमध्ये यासाठी तरतूद करावी. ५० फुट रूंद सारखाच ठेवावा.

मा. महापौर : ५० फुटाचा रस्ता करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुलमंडी ते पैठणगेट (टिळकपथ)औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना १५.०० मीटर रूंद रस्त्याने बाधीत क्षेत्र संपादन करण्यास त्यास लागणाऱ्या भूसंपादन खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते तसेच सदर भूसंपादनाचा सत्वर प्रस्ताव (Urgent Clause) म्हणून पाठविण्यासही मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका पशुवधगृह पडेगाव गट नं. ६६-६७ येथे स्थलांतर करण्यात आले आहेत सदर गटामध्ये परवानाधारक खाटीक यांना वसाहतीकरीता महानगरपालिका ठराव क्र.६५३ दि.२०/११/१९८७ अन्वे १३×१० = १३०-०० चौ.मी. भुखंड रू.३५००/- (आतील) व रू.४५००/- (रोडवर/कोपऱ्यात/एकुण -२०३ भुखंड (प्लॉट) उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

या भुखंडापैकी स्थाया समिती ठराव क्र.६४ दि.२६/७/२००६ अन्वये सादर केलेली यादी प्रमाणे १५२ परवानाधारकांना भुखंडाचे पुर्ण पैसे भरल्यामुळे देण्यात आले. तसेच पशुवधगृह मधील मजुर म्हणुन काम करणारे व्यक्ति (कमोत्री) यांना पण २०×३० = ६०० चौ.फुट चे भुखंड देण्याबद्दल सदर ठरावाने मान्यता देण्यात आली असता अशा एकुण ४७ कमोत्री यांना वरील दराप्रमाणे भुखंड देण्यात येईल.

सिल्लेखाना येथे असलेले चामडे, हाडे व आतड्याचे गोदाम पुर्णपणे पशुधन गृह येथे स्थलांतर करण्यात आले आहेत. यामध्ये एकुण (१२) चामडे गोदाम महानगरपालिकेने स्थायी समिती ठराव क्र.१६९/२ दि.४/११/९५ प्रमाणे १०×१५ = १५०.०० चौ.मी. आकाराचे भुखंडावर ४८.२४ चौ.मी. गोदाम बांधून देण्यात आले. ज्याची किंमत रूपये १,१८,०००/- होत असुन सदर गोदाम संबंधित खाटीकांकडून १५% टक्के रक्कम वसुल करून गोदाम देण्यात आले व उर्वरीत ८५% रक्कम ४० समान हप्त्यात संबंधितांकडून वसुल करण्यात येईल. या गोदामाशिवाय खाटीकांना १०×१५ =१५०.०० चौ.मी.चे आकाराचे भुखंड गोदाम बांधण्याकरिता स्थायी समिती ठराव क्र. ०९/०४ दि.९/६/९५ अन्वये रू.७०००/- किंमतीवर देण्यात आले आहेत.

यापुढे पडेगाव पशुवधगृह परिसरात वसाहती करता भुखंड किंवा हाडे, चामडे व आतडेच्या गोदामासाठी खाटीकांना वरील दर्शविलेल्या दरात भुखंड उपलब्ध करून देणे जेणे करून शहरात विशेषत: सिल्लेखाना भागात अशा प्रकारचे कोणतेही गोदाम राहणार नाही. अशा प्रकारचे भुखंड दिल्यास यंबंधित खाटीकांना विशेष मदत देऊन त्या भुखंडावर बांधकाम करणे बंधनकारक राहील. जेणेकरून देण्यात आलेल्या भुखंडावर बांधकाम केल्यास त्याचा योग्य वापर होईल. सबब सर्व साधारण सभा व स्थायी समितीच्या ठरावानुसार/ठरल्याप्रमाणे या पुढे ही पडेगाव येथे स्थलांतरीत झालेल्या पशुवधगृह प्रकल्पासाठी परवानाधारक खाटीकांना निवासी भुखंड, चामडे गोदाम इत्यादी प्रदान करणे/ वाटप करण्याचे अधिकार प्रदान करणेसाठी मा.आयुक्त यांना प्रदान करणेसाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या विचारार्थ सादर.

वरील प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री. संतोष खेंडके : हा विषय चर्चा करून स्थगित करावा.

श्री.मुजीब खान : मंजूरी देण्यात यावी. शहरातील नागरीकाच्या हिताचा विषय आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मंजुर करावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : शहरात जो कत्तलखाना होता दुर्गधी येते म्हणून स्थलांतरीतकेला परंतू त्या ठिकाणी बाजूबाजूच्या परीसरात २५ ते ३० हजार नागरीक राहतात नेहमी दुर्गधी येते.ती येणार नाही याची तातडीने कार्यवाही करावी.

मा. महापौर : दुर्गधी होवू नये म्हणून प्रशासनाचे काय नियोजन आहे खूलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : पैठणरोडवर ब्रुकबाँण्ड नावाची कंपनीच्या बाजूलाच एक कत्तलखाना असून दररोज २०० जनावराची कत्तल होते. परंतू तेथील दुर्गंधी रोडवर येत नाही.तेथे काय सिस्टीम यूज केली जाते संबधीत अधिकारी यांनी तेथे जावून माहिती घेवून पडेगांव येथे नागरीकांना दुर्गधी येणार नाही व त्रास होणार नाही याची दखल घेण्यात यावी.

श्रीमती कला बोरामणीकर: समर्थनगर भागाच्या बाजूला ती वसाहत आहे. नागरीकांना मोठया प्रमाणात त्रास होतो आहे.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : चिकलठाणा वसाहतीत महाराष्ट्र डिस्टलरीजची दुर्गधी येते तेथील सर्व कारखाने बंद करणार काय? हा प्रस्ताव दुरूस्तीसह मंजूर करावा

श्री.संतोष खेंडके : जोपर्यत शहानिशा होत नाही तोपर्यत हा विषय स्थगित ठेवावा.

श्री.मुजीब खान : हा प्रस्ताव यापूर्वी मंजूर केलेला आहे दुसऱ्यांदा का सादर करण्यात आलेला आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : अलाटमेंट लेटर दिलेले आहे.

संचालक,प्रांणीसंग्रहालय :१९८६ साली शासनाने ३६ एकर जमीन कत्तलखाना साठी दिलेली होती. यास केंद्र शासंनाचीही मंजूरी मिळालेली आहे. एअर पोर्ट ऑथरीटी, प्रदुषण बोर्डची एनओसी हे सर्व झाल्याच्यानंतर आपण तेथे कत्तलखाना सुरू केलेला आहे. मागिल बैठकीत ५० लक्षचा प्रोजेक्ट मंजूर झालेला आहे. बायोगॅस प्लॅन्ट आहे. तो कार्यान्वित झाल्यानंतर दुर्गधी पूर्ण बंद होईल. दुसरा नवीन ३.५० ते ४ कोटीचा प्रोजेक्ट हाती घेतलेला आहे.

श्री.मुजीब खान :यापूर्वी ठराव मंजूर केलेला होता. या विषयावर चर्चा करण्याची गरज नव्हती हा प्रस्ताव कशासाठी परत आणलेला आहे.

पशुसंवर्धन अधिकारी : यापूर्वी मंजूर झालेला आहे.

श्री.संतोष खेंडके : सिल्लेखाना प्रमाणेच येथील नागरीकांना दुर्गधीचा त्रास होवू नये यासाठी ठोस उपाययोजना करण्यासाठी सुधारीत प्रस्ताव हा आरोग्य समिती मार्फत या सभागृहासमोर ठेवण्यात यावा.

श्री.संजय रिडलॉन : हा प्रस्ताव आरोग्य समितीच्या माध्यमातून या सभागृहासमोर सादर करण्यात यावा.

मा.आयुक्त : ही जागा १९८६ ते ८७ मध्ये शासनाकडून मिळालेली होती. त्यावेळी प्रशासन होते त्यानीएक ठराव करून जे लोक या बिजनेसमध्ये होते त्यांना एक सवलतीच्या दरावर देण्याची मान्यता दिली होती. जरी मान्यता मिळाली तरी तेथे ते लोक गेले नाही. पाच सहा महिण्यापूर्वी शहरातील कत्तल बंद केली.

श्री.मुजीब खान : सभागृहाने या ठरावास यापूर्वी मंजूरी दिलेली आहे पूढील कार्यवाही आयुक्तांची होती ती करावयास पाहिजे. ठराव पून्हा ठेवण्याची गरज नाही.ते लोक तेथे का गेलेले नव्हते कोणत्या सुविधा दयायच्या बाकी आहे या बध्दल स्थायी समितीमध्ये सविस्तर चर्चा झालेली होती. पून्हा प्रस्ताव ठेवण्याची गरज नव्हती.

मा. आयुक्त :१९८७ मध्ये प्रशासकाने जो ठराव केला होता त्यावेळी प्लॉट काढलेले होते. आता तेथे आणखी प्लॉटची गरज आहे. सात आठ गोडाऊन बांधलेले आहे. आणखी नव्याने बांधावयाचे आहे. जे नव्याने बांधावयाचे आहे त्यासाठी प्रत्येक वेळी सभागृहासमोर येवून नव्याने ठराव घ्यावा लागेल. या बिजनेस मध्ये जे लोक आहे त्यांना प्लॉट दयायचे असेल तर मागिल रेट प्रमाणेच देंण्याची परवानगीची मागणी करीत आहोत. पॉलीसी प्रमाणे देण्याचे अधिकार देण्यात यावे. २०३ प्लॉट होते ते वाटप केले. आणखी जागा शिल्लक आहे.

श्री.मुजीब खान : कूणाच्या तरी दबावाखाली येवून हा प्रस्ताव पून्हा सादर केलेला आहे.

श्री.संतोष खेंडके : आरोग्य समिती सभापती तसेच सर्व पदाधिकारी यांनी स्थळ पाहणी करून पूढील बेठकीत हा विषय घेण्यात यावा.

मा. आयुक्त : जे प्लॉट होते ते वाटप केलेले आहे. पून्हा काही जागा आहे.त्यातील प्लॉट वाटप करण्यासाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी लागेल. ते अधिकार दयावे त्यानूसार कार्यवाही करता येईल.

मा. महापौर : या संदर्भात सर्व पदाधिकारी स्थळ पाहणी करतील व त्यानंतर निर्णय घेतला जाईल.

श्री.संतोष खेंडके : हा विषय आरोग्य समितीच्या अंतर्गत येतो त्या समितीच्या मार्फत सादर करावा. तेथील नागरीकाच्या भावनाचा विचार करून हा विषय तुर्त स्थगित ठेवावा.

याच वेळी हा ठराव मंजूर करावा म्हणून स.सदस्य मा.महापौर डायसमोर जावून मोठमोठयाने मागणी करतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: मंजूरी दयावी नंतर सर्व पदाधिकारी यांनी पाहणी करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : हा विषय शहराच्या शांततेचा व सुव्यवस्थेचा संदर्भात आहे.

श्री. भगवान घडमोडे : वादाचा विषय नाही. नागरीकांच्या आरोग्याचा विषय आहे. सर्वांनी जागेवर बसून चर्चा करावी.

मा.महापौर : विषय क्र.४ संदर्भात पाहणी करून निर्णय घेतला जाईल. यानंतर विषय क्र.७ यातील खाजगी व्यवस्थापनाद्वारे न करता मंजूरी देवून सर्व विषय मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संदर्भात सर्व पदाधिकारी स्थळ पाहणी करतील व त्यानंतर निर्णय घेतला जाईल, असे ठरले.

**विषय क्र. ७८५/५ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहे की, दिनांक १०.०८.२००६ रोजी मा.महापौर, मा.आयुक्त यांच्या सुचने प्रमाणे पैठण येथे पुरग्रस्तांना तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी या हेतूने एक वैद्यकीय पथक वाहनासह पैठण येथे पाठविण्यात आले होते. सदरील पथकासाठी कार्यालयीन

वाहन क्रमांक ४२०६ दिनांक १४.०८.२००६ नुसार रूपये दहा हजार अग्रीम घेण्यात आला होता, अग्रीम रक्कमेच्या पोटी रूपये ६०२९-०० खर्च झालेला आहे. सदरील खर्च हा औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्राबाहेर करण्यात आलेला आहे.

करीता आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळण्याच्या विनंतीसह प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १०.०८.२००६ रोजी पैठण येथे पुरग्रस्तांना वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी यासाठी एक वैद्यकीय पथक वाहनासह पैठण येथे पाठविण्यात आले होते. सदरील पथकासाठी कार्यालयीन वाहन क्रमांक ४२०६ दिनांक १४.०८.२००६ नुसार रूपये दहा हजार अग्रीम घेण्यात आला होता, अग्रीम रक्कमेपोटी रूपये ६०२९-०० झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८६/६ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेकडे १९९८ पासुन हस्तांतर करण्यात आलेली आहे. या योजनेवर जायकवाडी उद्‌भव ते क्रांतीचौक असे एकुण सात पंपींग स्टेशन आहेत. या सर्व पंपीग स्टेशनचा विद्युत पुरवठा कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग-२, औरंगाबाद यांचे नावे आहे. योजना हस्तांतरीत झाल्यामुळे सर्व पंपगृहाचा विद्युत पुरवठा उप आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या नावाने करणे आवश्यक आहे. विद्युत पुरवठा नावात बदल झाल्यास मासीक विद्युत देयकामध्ये आकारण्यात येणारी Electricity Duty माफ होण्यास मदत होईल, म्हणजेच दरमहा साधारणत: १०% एवढे वीज देयक कमी होईल व महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल. सद्यस्थितीत या सात पुपगृहासाठी दरमहा सर्वसाधारणपणे रूपये २.७५ कोटी एवढे वीज देयक येते. नावात बदल करण्यासाठी आवश्यक असलेले x, y व z नमुन्यातील अर्ज महानगरपालिकेकडून महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडे सादर करण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीकडून नावात बदल करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षा रक्कमेचा भरणा करण्याबाबतचा कळविले आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे पत्र SE/AUC/1/HT/३७५दिनांक २३/१/०६ नक्षत्रवाडी पंपगृह ग्राहक क्र. ४९००१९००१८९७ | ११,९६,७६२.०० |
| २ | SE/AUC/I/HT/२७७ दिनांक १९.०१.२००६ क्रांतीचौक पंपगृह, ग्राहक क्र.४९०००१९००७०० | १,५६,८७०.०० |
| | **शहरी मंडळाची मागणी रूपये (अ) १३,५३,६७०.००** | |
| | SE/ARC/TS/COM/५१७ दिनांक ०१.०२.२००७ | |
| ३ | जायकवाडी नवीन पंपगृह, ग्राहक क्रमांक ४९००१९००४८८८ | ४५,२०,३८२.०० |
| ४ | जायकवाडी जूने पंपगृह,ग्राहक क्रमांक ४९००१९००१५७९ | २८,२९,०७०.०० |
| ५ | ढोरकीन बुस्टर पंपगृह, ग्राहक क्रमांक ४९००१९००१८८९ | ४१,४८,५७०.०० |
| ६ | फारोळा जुने पंपगृह, ग्राहक क्रमांक ४९००१९००१५३७ | ३३,४६,३७०.०० |
| ७ | फारोळा नवीन पंपगृह ग्राहक क्रमांक ४९००१९००४८९६ | ७४,०७,७७०.०० |
| | **ग्रामीण मंडळाची मागणी रूपये (ब) २,२२,५२,१६२.००** | |
| | **एकुण (अ+ब) २,३६,०५,८३२.००** | |

वरील प्रमाणे एकुण रूपये २,३६,०५,८५२/- रक्कमेचा भरणा महाराष्ट्र विज वितरण कंपनीकडे करावा लागेल.

या सर्व पंपगृहासाठी सुरक्षा ठेवीपोटी रूपये १,३९,८८,७८०/- चा भरणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून केलेला होता. परंतु ही रक्कम बिलाच्या थकबाकीमध्ये समायोजीत करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र विज वितरण कंपनीकडून कळविण्यात आले आहे.

विद्युत देयकात आकारण्यात येत असलेली Electricity Duty माफ होण्यासाठी नावात बदल करून घेणे आवश्यक असल्याने त्यासाठी रक्कम रूपये २,३६,०५,८३२/- चा भरणा महाराष्ट्र विज वितरण कंपनीस करावायाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना महानगरपालिकेकडे १९९८ पासुन हस्तांतर करण्यात आलेली आहे. या योजनेवर जायकवाडी उद्‌भव ते क्रांतीचौक असे एकुण सात पंपींग स्टेशन आहे. या सर्व पंपीग स्टेशनचा विद्युत पुरवठा कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग-२, औरंगाबाद यांचे नावे असल्यामूळे, विद्युत देयकात आकारण्यात येत असलेली Electricity Duty माफ होण्यासाठी नावात बदल करून घेणे आवश्यक असल्याने व योजना हस्तांतरीत झाल्यामुळे सर्व पंपगृहाचा विद्युत पुरवठा उप आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या नावाने करणेस व त्यासाठी रक्कम रूपये २,३६,०५,८३२/- चा भरणा महाराष्ट्र विज वितरण कंपनीस करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८७/७ :**

आयुक्त महानगरपालिका यांचे कडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे संत एकनाथ रंग मंदीर नुतनीकरणा अंतर्गत विविध कामे करण्यात आली असुन या नाट्यगृहामध्ये पुर्वीची आसन व्यवस्था आहे. याबाबत नाट्यकर्मी व या क्षेत्रावरील जाणकारांनी खुर्च्या नव्याने बसवून आसन व्यवस्थाही सुधारीत करण्याबाबत सुचना केली. ज्यामुळे भविष्यामध्ये आसन व्यवस्था बदलण्यासाठी पुन्हा नाट्यगृह बंद ठेवावे लागणार नाही. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये २२.२५ लक्षचे तयार करण्यात आले त्यास व रक्कम रूपये २५.०० लक्षची तरतुद वळती करण्याबाबतच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र. ३२४ दिनांक ११.८.२००६ अन्वये मान्यता दिलेली आहे. तद्‌नंतर सदरील कामा करीता २४.९९ लक्षच्या सुधारीत अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.५९१ दिनांक २०.११.२००६ अन्वये मान्यता दिलेली असुन मान्यतेनुसार सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आलेल्या होत्या तथापी दिनांक १६.१.२००७ रोजीच्या मा.स्थायी समितीच्या बैठकीत फेरनिविदा करणे बाबत व रंगमंदीरातील खुर्च्या Push Back पध्दतीच्या ऐवजी Tip up पध्दतीच्या खुर्च्या बसविणे बाबत मा.स्थायी समितीने आदेशीत केलेले आहे. तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अहवालानुसार व खुर्च्याच्या दरामध्ये होत असलेली वाढ इ.कारणाने नविन खुर्च्या बसविण्याबाबतचे रक्कम रूपये २७.९२ लक्षचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामास्तव या आर्थिक वर्षात रक्कम रूपये २५.०० लक्षची तरतुद उपलब्ध असुन उर्वरीत ३.०० लक्ष रूपयांची वाढीव तरतुद आर्थिक वर्ष सन २००७-०८ मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरील कामाचे रक्कम रूपये २७.९२ लक्षच्या सुधारीत अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मान्यतेस्तव तसेच सदरील नाट्यगृहात नविन खुर्च्या बसविने देखभाल दुरूस्ती व उपलब्ध असलेल्या सर्व सोई-सुविधांसह व्यवस्थापनाची सर्व कामे ही तीन वर्षाकरीता खाजगी व्यवस्थापनेव्दारे करून घेण्यास

त्यांचेकडून दर मागविण्याचे धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय क्र.४ संदर्भात पाहणी करून निर्णय घेतला जाईल. यानंतर विषय क्र.७ यातील खाजगी व्यवस्थापनाद्वारे न करता मंजूरी देवून सर्व विषय मंजूर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदीरातील खुर्च्या Push Back पध्दतीच्या ऐवजी Tip up पध्दतीच्या नविन खुर्च्या बसविणेच्या रक्कम रूपये २७.९२ लक्षचे सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८८/८ :**

आयुक्त महानगरपालिका यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या नेहरू भवन या इमारतीच्या नुतनीकरणा अंतर्गत इमारतीस रंगरंगोटी करणे, पडदे बदलणे, आसन व्यवस्था बदलणे, विद्युत व्यवस्था करणे, व जनरेटर बसविणे, परिसर सौंदर्यीकरण करणे इत्यादी कामे करणेस्तव अंदाजे ५०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदरील कामे ही व्यवस्थापनेसह उपलब्ध असलेल्या सर्व सोयी सुविधासह तीन वर्षा करीता खाजगी व्यवस्थापनेव्दारे करून घेण्यास त्यांचेकडून दर मागविण्याचे धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या नेहरू भवन या इमारतीच्या नुतनीकरणा अंतर्गत इमारतीस रंगरंगोटी करणे, पडदे बदलणे, आसन व्यवस्था बदलणे, विद्युत व्यवस्था करणे, व जनरेटर बसविणे, परिसर सौंदर्यीकरण करणे इत्यादी कामे करणेच्या अंदाजे र.रू.५०.०० लक्ष खर्च व्यवस्थापनेसह उपलब्ध असलेल्या सर्व सोयी सुविधासह तीन वर्षा करीता खाजगी व्यवस्थापनेव्दारे करून घेण्यास व त्यांचेकडून दर मागविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८९/९ :**

मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८०/६८ दिनांक ३०/९/२००० अन्वये मिसारवाडी ही वसाहत गलीच्छ वस्ती म्हणून घोषीत करण्याबाबत मान्यता झालेली आहे. मा.आयुक्तांनी त्यांचे आदेश क्र.मनपा/मआ/०१/०७ दि.४/जानेवारी/२००७ अन्वये. शहर अभियंता यांना असे आदेशीत केले आहे की, महाराष्ट्र स्लम एरीयाज इम्प्रूव्हमेंट क्लिअंरस ॲन्ड रिडेव्हलपमेंट ॲक्ट १९७१ नुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील पात्र वसाहतींना झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करण्याची कार्यवाही शहर अभियंता विभागामार्फत करण्यात यावी त्यासाठी उपरोल्लेखीत कायद्याच्या कलम ३ (ए) अंतर्गत झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून शहर अभियंता हे असतील असे अधिकार प्रदान करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे सादर करावा.

करीता प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.८०/६८ दिनांक ३०/९/२००० अन्वये दिलेल्या मान्यते नुसार महाराष्ट्र स्लम एरीयाज इम्प्रूव्हमेंट क्लिअंरस ॲन्ड रिडेव्हलपमेंट ॲक्ट १९७१ च्या कलम ३ (ए) नुसार मिसारवाडी ही वसाहत झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणुन शहर अभियंता यांची नियुक्ती होण्यासाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.८०/६८ दिनांक ३०/९/२००० अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र स्लम एरीयाज इम्प्रूव्हमेंट क्लिअंरस ॲन्ड रिडेव्हलपमेंट ॲक्ट १९७१ च्या कलम ३ (ए) नुसार मिसारवाडी ही वसाहत झोपडपट्टी सुधार विभाग म्हणुन घोषित करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणुन शहर अभियंता यांची नियुक्ती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९०/१० :**

दिनांक २०-३-२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.३०३ अन्वये ज्योतीनगर येथे पोहण्याचा तलाव बांधणे या बोल्ट प्रकल्पासाठी मे.शलाका इंजिनिअर्स यांची निविदा स्विकारणेस मंजुरी दिलेली आहे.

बी.ओ.एल.टी.तत्वावर हाती घ्यावयाचे प्रकल्पासाठी बी.ओ.एल.टी.समितीचे,ज्योतीनगर येथे स्विमींग पुल बांधणेसाठी निविदा कार्यवाहीचे निर्देश प्राप्त आहेत.

सदर न.भु.क्र.१६२६१ ही महानगरपालिकेच्या मजूर रेखांकन ज्योतीनगर येथील खुल्या जागेतील एकूण क्षेत्र ४२२९.५० चौ.मी. पैकी ५०% जागा म्हणजे २११४.७५ चौ.मी. क्षेत्रामध्ये स्वीमींग पुल बांधण्यासाठी व बांधीव क्षेत्र ४२२.९५ चौ.मी. विकासक यांना ९९ वर्षाच्या भाडेतत्वावर देण्यासाठी निविदा काढणेसाठी निर्देश असून बोल्ट तत्वावरील प्रकल्पासाठी जाहीर निविदा सूचना दिनांक २८-१२-०६ रोजी राज्य पातळीवरील वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. दिनांक २९-१-०७ रोजी निविदापूर्व बैठक मा.आयुक्त यांचे दालनात घेण्यात आली. निविदा स्विकृतीची शेवटची तारीख दि.३.२.०७ होती.

निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांका पर्यंत एकूण २ निविदा प्राप्त झाल्या आहेत.

१. मे. शलाका इंजिनिअर्स

२. मे. राठी कन्स्ट्रक्शन्स कंपनी

निविदा तीन लिफाफा पध्दतीनुसार मागविण्यात आल्या असून प्राप्त निविदांची, निविदा प्रक्रीया पध्दतीनुसार लिफ़ाफ़ा क्रमांक १ व २ ची छाननी करण्यात आली व पात्रता निकष पूर्ण होणाऱ्या दोन्ही निविदांचे लिफ़ाफ़ा क्रमांक ३ उघडण्यात आले. त्याचे दर पुढे नमूद प्रमाणे आहेत.

१. मे. शलाका इंजिनिअर्स — प्रिमियम रू. १,७५,०००/-

२. मे. राठी कन्स्ट्रक्शन्स कंपनी — प्रिमियम रू. २५,०००/-

उपरोक्त प्रमाणे प्राप्त देकार दरापैकी मे. शलाका इंजिनिअर्स यांचा दर तुलनात्मकदृष्ट्या उच्चतम प्राप्त आहे. सदर प्रकल्पाचे भूखंड क्षेत्र ४२२९.५ चौ.मी. असून ५०% क्षेत्र म्हणजे २११४.७५ चौ.मी. क्षेत्रामध्ये स्वीमींग पुल बांधणे व बांधीव क्षेत्र ४२२.९५ चौ.मी. विकासक यांना ९९ वर्षे भाडे तत्वावर द्यावयाचे आहे. सदर बांधीव क्षेत्रासाठी ९९ वर्षासाठी भाडेपट्टा दर रू.५/- प्रती चौरस मीटर प्रति माह या प्रमाणे राहणार आहे.

वाटाघाटी अंती मा. आयुक्तांनी विकासक यांना प्रिमियम ऑफ़र वाढविणे बद्दल सूचविले असता विकासक यांनी प्रिमियम रू.४,००,०००/- महानगरपालिकेस देण्याबद्दल निविदेतील इतर अटी व शर्तीसह संमती दर्शविली आहे.

सदर प्रकल्पामुळे मिळणाऱ्या प्रिमियमचा वापर याच रेखांकनामधील खुल्या जागेच्या विकासासाठी करण्यात येईल.

तरी वरील प्रमाणे मे. शलाका इंजिनिअर्स यांचे देकार दर रू.४,००,०००/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.शलाका इंजिनिअर्स यांची सदर बोल्ट प्रकल्पासाठीची निविदा व ९९ वर्षाच्या भाडेपट्‌ट्याच्या करारावर प्रकल्प विकसीत करणेसाठी देण्यास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्योतीनगर येथे पोहण्याचा तलाव बांधणे या बोल्ट प्रकल्पासाठी मे.शलाका इंजिनिअर्स यांचे देकार दर रू.४,००,०००/- हे महानगरपालिकेस लाभदायक असल्याने मे.शलाका इंजिनिअर्स यांची सदर बोल्ट प्रकल्पासाठीची निविदा व ९९ वर्षाच्या भाडेपट्‌ट्याच्या करारावर निविदेतील इतर अटी व शर्तीसह प्रकल्प विकसीत करणेसाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र. ७९१/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरा लगत असलेली जिल्हा परिषदेच्या कार्यालया मागील मैदान विविध क्रीडा स्पर्धा घेण्यासाठी राखीव ठेवण्यात यावे. औरंगाबाद शहराच्या मध्यवस्तीत क्रीडा स्पर्धा भरविण्यासाठी कुठलेच मैदान शिल्लक नाही. तसेच या मैदानावर नेहमीच छोट्या मोठ्या क्रीडा स्पर्धा तसेच महापौर स्पर्धा भरविण्यासाठी भविष्यात या मैदानाचा उपयोग पडू शकतो. तसेच अनेक क्रीडा प्रेमींची सुध्दा इच्छा आहे की, या मैदानाचा विकास होवून हे मैदान राखीव ठेवण्यात यावे.

करीता आपण वरील सर्व बाबींचा सहानुभुतीपूर्वक विचार हा अर्ज सर्व साधारण सभेमध्ये मंजुर करण्यात यावा हि विनंती.

सुचक : श्री.वसंत नरवडे पाटील                अनुमोदक : सौ.लताताई दलाल, श्री.किशोर तुलसीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरालगत असलेल्या जिल्हा परिषदेच्या कार्यालयामागील मैदान विविध क्रीडा स्पर्धा घेण्यासाठी राखीव ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९२/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क क्र.२९ गणेश कॉलोणी या प्रभागात आरोग्य केंद्र असणे अति आवश्यक आहे. या प्रभागात बी.पी.एल. आणि दारिद्रय रेषेखालील कुटूंब मोठ्या प्रमाणात राहतात. या आरोग्य केंद्र करिता या वार्डात पुरेशी जागा उपलब्ध आहे. या परिसरातील चार वार्डाची लोकसंख्या जवळपास ४० ते ५० हजार असून गणेश कॉलनी प्रभागात एक आरोग्य केंद्र सुरू केल्यास याचा लाभ केंद्र सुरू करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेस मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.जावेद कुरैशी                अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.मिलींद दाभाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागात उपलब्ध जागेवर आरोग्य केंद्र उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९३/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अभिनय रोड ते, जुना मोंढा रोड (किराणा चावडी) या चौकाला महानगरपालिकेकडून सम्राट अशोक चौक असे नामकरण करण्यात आलेले आहे. त्या भागाच्या नागरीकांची मागणी असल्यामुळे त्या भागामध्ये सम्राट अशोक यांचा पुतळा बसविणे गरजेचे आहे. करीता त्या चौकात सम्राट अशोक पुतळा बसविण्यासाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजु सुग्रीव रिडलॉन, सौ.सरला पोळ.

अनुमोदक : सौ.मंगला प्रकाश गायकवाड, श्री.मिलींद दाभाडे, श्री.महेश माळवतकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,अभिनय रोड ते जुना मोंढा रोड (किराणा चावडी) सम्राट अशोक चौकात सम्राट अशोक यांचा पुतळा बसविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९४/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराच्या महापौर चषक करीता २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात क्रिडानिहाय भारतीय खेळांना आर्थिक तरतुद व्हावी. ज्यात कबड्डी, खो-खो, कुस्ती या तिनही खेळांना विशेष प्राधान्याने तरतुद करून ही रक्कम इतर खेळावर खर्च न करता ह्या स्पर्धा दरवर्षी आयोजीत कराव्यात. व इतर खेळांनाही तरतुद करावी. परंतु वरील तिन्ही खेळ सतत चालू ठेवण्याकरीता काही शाळा व नोंदणीकृत मंडळांना प्रशिक्षणा करीता व खेळाडूंना प्रोत्साहीत करण्याकरीता व खेळाडू तयार करण्याकरीता आवश्यक वाटते.

तरी वरील तिन्ही खेळांना तीन लाख रूपये प्रत्येकी एक लाख प्रमाणे प्रशिक्षणावर तरतुदीचा समावेश करावा यासाठी आपल्या विभागातील क्रिडा अधिकाऱ्यांना या संबंधी अहवाल करीता शहरातील क्रिडा संघटना व माध्यमिक शाळांचे निवड करणेसाठी दर तीन महिन्याला अहवाल मागवावे या माध्यमातुन नविन खेळाडू निर्माण करण्यास व शहराचे नावलौकीक होण्यास मदत होईल.

सुचक : श्री.वसंत नरवडे पाटील

अनुमोदक : श्री.किशोर तुलसीबागवाले,श्री.रेणुकादास वैद्य,श्री.संतोष खेंडके,श्री.अ.साजेद अ.सत्तार,
श्री.प्रशांत देसरडा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या महापौर चषक स्पर्धेकरीता २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात कबड्डी, खो-खो, कुस्ती या तिनही खेळांना तीन लाख रूपये प्रत्येकी एक लाख प्रमाणे प्रशिक्षणावर तरतुदीचा समावेश करणेस तसेच महापालिका क्रिडा अधिकाऱ्यांनी यासंबंधी अहवालाकरीता शहरातील क्रिडा संघटना व माध्यमिक शाळांचे निवड करणेसाठी दर तीन महिन्याला अहवाल मागवावे यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ७९५/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८६ प्रियदर्शनी इंदिरानगर या भागात १००% दलित नागरीक रहात असून या भागातील नागरी सुविधा जसे, नविन जलवाहीनी, नविन जलनि:सारण वाहिनी, कॉंक्रीटचे रस्ते, डांबरीकरण गटारी, आदी आवश्यक कामे करण्यासाठी अंदाजे ७० लाख रूपयांची आवश्यकता आहे. करीता सदर खर्च दलित वस्ती सुधार शासन योजनेमार्फत करणे करीताचा प्रस्ताव

मंजुरीस्तव सादर तसेच सदरील कामाकरीता उपरोक्त प्रमाणे आवश्यक निधीची (७० लक्ष) तरतूद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणे करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.वंदना खंदारे　　　　अनुमोदक : श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८६ प्रियदर्शनी इंदिरानगर या भागातील १००% दलित वस्तीत नागरी सुविधा जसे, नविन जलवाहीनी, नविन जलनि:सारण वाहिनी, कॉंक्रीटचे रस्ते, डांबरीकरण गटारी, आदी कामे करण्यासाठी अंदाजे र.रू.७० लाखाच्या कामास मंजुरी देण्यांत येवून सदर खर्च दलित वस्ती सुधार शासन योजनेमार्फत निधीची तरतूद करण्याकरीता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) या संस्थेला एन-१० टी.व्ही.सेंटर संभाजी मैदान (प्राकृतिक मैदान) व ग्रामीण पोलीस मुख्यालय या मधील मोकळी जागा इस्कॉनच्या वैद्यीक सांस्कृतिक केंद्रासाठी लिजवर देणेसाठी महानगरपालिकेकडून सदरील संस्थेला नाममात्र शुल्क आकारून सदरील जागा अंतरराष्ट्रीय कृष्णभवनामृत संघ (इस्कॉन) यांना देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील,सौ.लता दलाल,श्री.अनिल जैस्वाल

अनुमोदक : श्री.महेश माळवतकर, श्री.भाऊसाहेब ताठे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-१० टी.व्ही.सेंटर संभाजी मैदान (प्राकृतिक मैदान) व ग्रामीण पोलीस मुख्यालय या मधील मोकळी जागा अंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) या संस्थेला इस्कॉनच्या वैद्यीक सांस्कृतिक केंद्रासाठी नाममात्र शुल्क आकारून लिजवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९७/३ :**

औरंगाबाद शहर हे मराठवाड्याच्या राजधानीचे शहर आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटनांच्या दृष्टीने महत्वपूर्ण असे शहर आहे. संपूर्ण मराठवाड्या बरोबरच शेजारच्या नाशिक,जळगांव,नगर इत्यादी जिल्ह्यांना हे शहर मध्यवर्ती ठिकाण पडते. आशियाखंडातील वेगाने वाढणारे शहर म्हणून औरंगाबाद शहर ओळखले जाते. आजमितीला औरंगाबाद शहराची लोकसंख्या ही १२ लाखापेक्षाही जास्त आहे.

वरील सर्व बाबीचा विचार करता सध्या औरंगाबाद शहरात कार्यरत असणारे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे रूग्णालय (घाटी) हे वाढत्या रूग्णांना आरोग्य सेवा देण्यास कमी पडत आहे. त्यामूळे औरंगाबाद महानगरपालिकेच्या वतीने सर्व प्रकारच्या आरोग्य सेवेने परिपूर्ण असे रूग्णालय उभारणे आवश्यक आहे.

करिता औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या वतीने सर्व प्रकारच्या आरोग्य सेवेने परिपूर्ण असे ३०० खाटांचे रूग्णालय उभारणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : १. सौ.लता दलाल, २.श्री.संतोष खेंडके, ३.श्री.महेश माळवतकर

अनुमोदक : १.श्री.अब्दुल साजेद, २.श्री.रशिद खान मामु, ३.श्री.भगवान घडमोडे, ४.डॉ.आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात महानगरपालिकेच्या वतीने सर्व प्रकारच्या आरोग्य सेवेने परिपूर्ण असे ३०० खाटांचे रूग्णालय उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ७९८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पदमपुरा वॉर्ड क्र.९५ येथील मोची मोहल्ला भागातील खूल्या जागेवर पेव्हींग सिमेंट ब्लॉक बसविण्यासाठी टेंडर मंजुर झाले असून, मोची मोहल्ला येथील खूल्या जागेवर पाण्याची नविन लाईन व ड्रेनेज लाईन टाकणे जरूरी असल्यामूळे तेथील पेव्हींग सिमेंट ब्लॉकचे काम मोची मोहल्ला (स्लम) ऐवजी नविन वस्ती, येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा समोरील खूल्या जागेवर करण्यास मंजुरी देण्यांत यावी, ही विनंती.

सुचक : श्री.गजानन रामकिसन बारवाल, श्री.संतोष खेंडके पाटील

अनुमोदक : श्री.रेणुकादास (राजु) वैद्य, श्री.भगवान (बापु) घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पदमपुरा वॉर्ड क्र.९५ येथील मोची मोहल्ला भागातील खूल्या जागेवर पेव्हींग सिमेंट ब्लॉक बसविण्यासाठी टेंडर मंजुर झाले असून, मोची मोहल्ला येथील खूल्या जागेवर पाण्याची नविन लाईन व ड्रेनेज लाईन टाकणे जरूरी असल्यामूळे तेथील पेव्हींग सिमेंट ब्लॉकचे काम मोची मोहल्ला (स्लम) ऐवजी नविन वस्ती, येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा समोरील खूल्या जागेवर बसविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पुंडलिकनगर  हा परिसर सर्वसामान्य नागरीकांना आपल्या घराची स्वप्ने साकार व्हावी या उद्देशाने कै.पुंडलिक राऊत यांनी पुंडलिकनगर या वसाहतीची उभारणी करून तसेच नागरीकांच्या मुलभूत सुविधेसाठी मागील २५ वर्ष मोलाचे योगदान दिले.  ही बाब लक्षात घेता त्यांच्या स्मृतीचा उजाळा व्हावा यासाठी कै.पुंडलिक राऊत स्मृतीस्तंभ उभारावा अशी या परिसरातील नागरीक सतत मागणी करत असून यांची मागणी विचारात घेता पुंडलिकनगर या परिसरामध्ये कै.पुंडलिक राऊत स्मृतीस्तंभ उभारण्यात यावा.  करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : १.श्री.संतोष खेंडके पाटील, २.श्री.भगवान घडमोडे, ३.श्री.विजय खुडे

अनुमोदक : १.श्री.सतिष कटकटे, २.श्री.शंशाक विसपुते

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,पुंडलिकनगर परिसरामध्ये कै.पुंडलिक राऊत स्मृतीस्तंभ उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८०० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वार्डात प्रभाग क्र.२१ स्वामी विवेकानंद हौसींग सोसायटी व आदर्श विनायक हौसींग सोसायटी येथील खूल्या जागेत खेळणी बसविणे हे काम मंजूर असून त्याची वर्क ऑर्डर देखील झालेली आहे.  या कामासाठी अर्थसंकल्प २००६-०७ यामध्ये तरतूद ठेवण्यात आलेली नाही.  या कामाचा लेखाशिर्ष नविन उद्यान हे आहे.  तथापी माझ्या वॉर्डातीलच विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षा अंतर्गत अ.क्र.३३ वर प्रभाग क्र.८८ शहानुरवाडी येथील खूली जागा

विकसीत करणे यासाठी र.रू.१,५०,०००/- ची तरतूद आहे.  हे काम अद्याप मंजुर झाले नसल्यामूळे या कामासाठीची तरतूद उपरोक्त कामासाठी तरतूद वळती करण्यात यावी.  ही विनंती.

सुचक : श्री.संजय जोशी                                    अनुमोदक : श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२१ स्वामी विवेकानंद हौसींग सोसायटी व आदर्श विनायक हौसींग सोसायटी येथील खूल्या जागेत खेळणी बसविणे या मंजूर कामाची वर्क ऑर्डर झालेली असल्यामूळे व या कामासाठी अर्थसंकल्प २००६-०७ यामध्ये तरतूद ठेवण्यात आलेली नसल्यामूळे, विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण या लेखाशिर्षा अंतर्गत अ.क्र.३३ वर प्रभाग क्र.८८ शहानुरवाडी येथील खूली जागा विकसीत करणे यासाठी र.रू.१,५०,०००/- ची असलेली तरतूद उपरोक्त कामासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.